महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission
मुख्य कार्यालय : ५/१, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३११५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

# जिल्हा आरोग्य अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ

**धारिका क्रमांक : ४८२ (६५)/ १५०९/ पंधरा-अ**

**जाहिरात क्रमांक : २९/२०१७**

आयोगामार्फत **महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य संचालनालयामधील** **जिल्हा आरोग्य अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ (District Health Officer, Maharashtra Medical & Health Services, Group-A)** **या पदाच्या एकूण ३० जागांच्या** भरतीसाठी ऑनलाईन पद्धतीने **अर्ज** मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :- ३०**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ४ | २ | १ | - | १ | - | २ | ५ | १५ | १५ | ३० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक /समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ३ | १ | १ | - | - | - | २ | ३ | १० | १० | २० |
| अ)महिला (३०%) | १* | १* | - | - | १* | - | - | २* | ५* | ४* | ९ |
| ब) खेळाडू (५%) | - | - | - | - | - | - | - | - | - | १ ☑ | १ |
| क) अपंग (३%) | एकूण ३० जागांपैकी १ जागा श्रवण शक्तीतील दोष ( Hearing Impairment) या विकलांग उपप्रवर्गासाठी आरक्षित असून, सदर उपप्रवर्गातून उमेदवार उपलब्ध न झाल्यास अंधत्व किंवा क्षीणदृष्टी ( Blindness or Low Vision) व चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु ( Locomotor Disability or Cerebral Palsy) या उपप्रवर्गातून भरण्यात येईल. | | | | | | | | | | |

*** उपलब्ध असल्यास महिलांसाठी आरक्षित ☑ उपलब्ध असल्यास खेळाडूसाठी आरक्षित.**

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय क्रमांक अपंग २००४/५५/समन्वय-२ दिनांक २७ फेब्रुवारी, २००९ अन्वये प्रस्तुत पदासाठी श्रवण शक्तीतील दोष ( Hearing Impairment), अंधत्व किंवा क्षीणदृष्टी ( Blindness or Low Vision) वा चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु ( Locomotor Disability or Cerebral Palsy) असे विकलांगत्व असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र आहेत.

**२.३** वि.जा. (अ), भ.ज. (ब), भ.ज.(क) व भ.ज. (ड) या वर्गवारीसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदावर योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासनाच्या अंतर्गत परिवर्तनीयतेच्या धोरणानुसार सदर पदासाठी भ.ज. (ब) व भ.ज. (ड) यापैकी उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा शासनाच्या अद्ययावत धोरणानुसार गुणवत्तेच्या आधारावर विचार करण्यात येईल.

**२.४** महिला आरक्षण व त्या संबंधातील NCL तसेच मागासवर्गीय व त्या संदर्भातील NCL चा नमूना आणि इतर अटी व शर्तीबाबत उमेदवारांनी आयोगाच्या संकेतस्थळावरील "सरळसेवा भरती" विभागातील "उमेदवारांना सर्वसाधारण सूचनाचे काळजीपूर्वक अवलोकन करुनच त्यांचे अनुपालन करावे.

**३. वेतनश्रेणी:-** रु. १५,६०० - रु. ३९,१०० + ग्रेड पे रु. ६,६००/-

**४. पात्रता:-** उमेदवार भारतीय नागरिक असावा.

**४.१ वय:- दिनांक १ सप्टेंबर, २०१७ रोजी अमागास वर्गवारीकरीता ३८ वर्षे व मागास वर्गवारीकरीता ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.**

**४.२** महाराष्ट्र शासनाच्या सेवेतील कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

**४.३** शासन आदेशानुसार अपंग व माजी सैनिक इत्यादींसाठी वयोमर्यादा नियमानुसार शिथिलक्षम राहील.

**४.४ पात्र खेळाडूंच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ४३ वर्षांपर्यंत शिथिलक्षम राहील.**

**४.५** अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोग विचार करु शकेल. परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी पुरेसे उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिलीकरणास्तव विचारात घेतला जाईल.

**४.६** खेळाडूचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. खेळाडूसाठी राखीव पदाकरीता दावा करणा-या उमेदवारांनी त्यांची खेळाडू असल्याबाबतची प्रमाणपत्रे गट-अ पदासाठी खेळाडू कोट्यातील पदासाठी पात्र असल्याचे मुलाखतीच्या तारखेपुर्वी क्रीडा संचालनालयाकडून प्रमाणित करुन घेणे बंधनकारक आहे. मुलाखतीच्या दिवशी खेळाडू कोट्यातून गट-अ पदासाठी पात्र असल्याचे प्रमाणपत्र सादर न केल्यास त्या उमेदवाराचा खेळाडूचा दावा आयोग ग्राहय धरणार नाही. खेळाडूकरीता आरक्षित पदासाठी खेळाडू उमेदवार म्हणून दावा करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचना मधील परि.४.५ ची आवश्यक ती नोंद घ्यावी.

**४.७ Qualification :-**

Candidate must Possess :

४.७.१ M.B.B.S. degree of a statutory University or any other qualification specified in the First Schedule or Second Scheduled to the Indian Medical Council Act.1956; and

४.७.२ Post-graduate degree in Preventive & Social Medicine or post-graduate Diploma in Public Health (D.P.H.) or a qualification accepted as equivalent by the Medical Council of India, and

**४.८ अनुभव** -Experience of Health administration, Medical relief or Family planning, Malaria/ Leprosy under Government, Zilha Parishad or a local Body for not less than 5 years in the case of those holding post-graduate degree and for not less than 7 years in the case of those holding post graduate diploma, gained after acquiring the MBBS degree.

**४.९ अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जमाती किंवा भटक्या जमाती यांतील उमेदवारांसाठी आरक्षित रिक्त जागा भरण्यासाठी त्यासाठीची आवश्यक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव धारण करणारे उमेदवार पुरेशा संख्येत उपलब्ध झाले नाहीत तर अशा वर्गवारीतील आरक्षित पदे भरण्याच्या दृष्टीने अशा वर्गवारीतील उमेदवारांना योग्य उमेदवारांची निवड करण्यासाठी तयार केलेल्या उच्च शैक्षणिक अर्हता आणि/ किंवा अनुभव कालावधी शिथिल करण्याबाबत आयोग स्वेच्छाधिकारानुसार विचार करु शकेल.**

**टीप – मुलाखतीच्यावेळी उमेदवाराने सादर करावयाच्या अनुभव प्रमाणपत्रामध्ये वरील ४.८ मधील कर्तव्ये व जबाबदाऱ्यांचे स्वरुप असलेला अनुभव नमूद केलेला असणे आवश्यक आहे.**

**४.१०** The selected candidate will have to sign an agreement embodying the conditions of his service including the condition to serve Government for a period of **5 years** or to pay penalty of **Rs.500/-** or such other sum as may be prescribed by Govt.

**४.११** The selected candidate will have to get himself / herself registered under Maharashtra Medical Council Act 1965, before joining or his / her name should be borne in Indian Medical Council Register.

**४.१२** The selected candidates will be debarred from doing any private practice but can be paid compensatory allowance in lieu according to the rules.

**४.१३** Period of probation will be two years

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव इत्यादी अर्हता किमान असून, केवळ किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव किंवा अन्य योग्य निकष याच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि/अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. **चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या** सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

६. **जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

७. **कर्तव्ये व जबाबदा-या** :- प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

८. **शुल्क** :- ८.१ अमागास उमेदवारांकरिता- **रु. ५२३/-** २) मागासवर्गीय उमेदवारांकरिता - **रु. ३२३/-**

८.२ ज्या मागासवर्गीय उमेदवारांनी वयोमर्यादा, परीक्षा शुल्क किंवा पात्रतेच्या निकषांमध्ये कोणतीही सवलत किंवा सूट याचा फायदा घेतला आहे, अशा उमेदवारांची अमागास (सर्वसाधारण) वर्गवारीच्या पदावर शिफारस करण्यात येणार नाही.

९. अर्ज करण्याची पध्दत –

९.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

९.२ पात्र उमेदवारांना वेब-बेस्ड (**Web-based**) ऑन लाईन अर्ज **https://mahampsc.mahaonline.gov.in** या वेबसाईटद्वारे **दिनांक ५ मे, २०१७ ते दिनांक २५ मे, २०१७** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

९.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

९.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

९.५ आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४)क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/ सीएससी (नागरीक सेवा केंद्र)

९.६ www.mahaonline.gov.in व https://mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतींमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

९.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) " माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर ' **Unpaid** ' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी '**Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) "**Pay Now**" या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. (१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३) चलनाद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

१०. चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर व परीक्षेपूर्वी **७** दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमदेवाराने चाळणी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व चाळणी परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

११. चाळणी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय चाळणी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१२. समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१३. मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना, मुलाखतीचे वेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचे वेळी सादर न केल्यास अथवा ती योग्य नसल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.

१४. चाळणी परिक्षा झाल्यास त्या परीक्षेचे गुण व मुलाखतीचे गुण एकत्रीतरित्या विचारात घेवून तर चाळणी परिक्षा न झाल्यास केवळ मुलाखतीचे गुणांआधारे उमेदवाराची शिफारस करण्यात येईल.

१५. **आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक किंवा संपर्क साधने आणण्यास वा वापरण्यास सक्त मनाई आहे.**

१६. **विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २५ मे, २०१७ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

१७. **चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २६ मे, २०१७ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**ठिकाण :- मुंबई**
**दिनांक :- ५/०५/२०१७**

**राजन बा. खोत**
**उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**